The People's Education Society's

**JAMKHED MAHAVIDYALAYA, JAMKHED,**

**Dist. Ahmednagar (MS)**

Affiliated to

**Savitribai Phule Pune University**

---

# बारामती येथे संपन्न झालेल्या,"स्वररंग २०२३' मध्ये जामखेड महाविद्यालयाला दोन पारितोषिके

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत बारामती येथे संपन्न झालेल्या"स्वररंग आंतर-महाविद्यालयीन युवा महोत्सव' 2023 मध्ये जामखेड महाविद्यालय जामखेडला दोन पारितोषिके मिळाली. जामखेड महाविद्यालयाची विद्यार्थिनी आरती मते हिने महोत्सवात दोन बक्षिसे पटकावली. तिला 'भारतीय शास्त्री गायन' मध्ये दुसरे पारितोषिक आणि 'सोलो सुगम गायन' मध्ये तिसरे पारितोषिक मिळाले. 29 सप्टेंबर 2023 रोजी बारामती येथे विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि. पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. आरती मते हिचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम एल डोंगरे यांनी हार्दिक अभिनंदन केले व व्होकल आर्टमध्ये भावी यशासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव दिल्यास महाविद्यालयाच्या नावलौकिकात विद्यार्थी भर घालतील अशा अपेक्षा व्यक्त करून सांस्कृतिक मंडळाच्या सर्व शिक्षकांचे मनापासून कौतुक केले. या यशाबद्दल , पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री उद्धव (बापू) देशमुख, उपाध्यक्ष मा.श्री अरुण (काका) चिंतामणी, सचिव मा. श्री शशिकांतजी देशमुख, खजिनदार मा. राजेशजी मोरे, सर्व संचालक मंडळ सदस्य, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य या सर्वांनी मनापासून कौतुक करून अभिनंदन केले ., तसेच उपप्राचार्य प्रा.डॉ.नरके एस.वाय. सांस्कृतिक समन्वयक, डॉ. देशपांडे आर.के., विद्यार्थी विकास अधिकारी, डॉ. गौरव मस्के, सांस्कृतिक मंडळ कमिटीचे सर्व सदस्य आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पदक विजेती आरतीचे अभिनंदन केले.

